# GOODDAY VENTURES INDIA PRIVATE LIMITED - IN LIQUIDATION

**LLPIN: U29190MH1992PTC065241**

**Regd. Add: 133 Clover Centrecamp 7 Moledina Road Na Pune Mh 411001.**

**E-Auction Notice**

Sale of Asset of Corporate Debtor on Standalone basis under the Insolvency and Bankruptcy Code, 2016 r/w IBBI (Liquidation Process) Regulations, 2016.

**Date and Time of E-Auction: 30th October 2023 at 11:00 AM to 02:00 PM**
**(With the unlimited extension of 10 minutes each)**

Sale of Asset of Corporate Debtor on Standalone basis by the liquidator appointed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench vide order dated 03rd March 2023 in I.A. 2883 OF 2021 IN C.P.(IB) No. 3060 of 2019. The sale will be done by the undersigned through the E-auction platform **https://eauctions.co.in (Linkstar Infosys Private Limited)**

| Details of Assets | Block | Reserve Price | Earnest Money Deposit | Incremental Value |
|---|---|---|---|---|
| Residential House No. B-2 & C-3, Mon Castle, Survey No. 68/1,68/2, 68/3/1, 68/3/2a,68/4, 68/5, 68/6, Utopia Co-op. Hsg. Soc. Wonawrie, Taluka- Haveli,Pune area admeasuring 4150 Sq. Ft, in total. ('Row House Property') | I | ₹ 5,29,12,500.00 | ₹ 52,00,000.00 | ₹ 2,00,000.00 |

| | |
|---|---|
| Last date of submission of Eligibility Documents | **13th October 2023 before 05:00 P.M. in the manner mentioned in detail E-auction Process Document** |
| Declaration of Eligibility Bidder | **16th October 2023 before 05:00 P.M.** |
| Inspection of Assets of Corporate Debtor | **From 17th October 2023 to 25th October 2023.** |
| Last Date for submission of Earnest Money Deposit | **28th October 2023** |
| Date and time of E-Auction for qualified bidders | **30th October 2023 at 11:00 AM to 02:00 PM** |

**Terms & Conditions of the sale is as under:**

**1.** E-Auction will be conducted on **"AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER THERE IS BASIS(Excluding the furnishing, fixtures and equipments, if any)" AND "NO RECOURSE BASIS"** as such sale is without any kind of warranties and indemnities through approved service provider Linkstar Infosys Private Limited Contact person on behalf of E-Auction Agency (Linkstar): Contact person: Mr. Dixit Prajapati Email **id-admin@eauctions.co.in**, Mobile No.: +91 9870099713

**2.** Documents shall be submitted to Liquidator through email and hard copy in the format prescribed in the detailed E-auction Process Document **on or before 13th October 2023 before 05:00 P.M** The bid form along with detailed terms & conditions of the complete E-auction process can be downloaded from the website **https://eauctions.co.in.**

**3.** It is clarified that this invitation purports to invite prospective bidders and does not create any kind of binding obligation on the part of the Liquidator or the Company to effectuate the sale. The Liquidator reserves the right to cancel or modify the process and/or not to accept and/or disqualify any interested party / potential investor/bidder without assigning any reason and without any liability.

**4.** All the terms and conditions are to be mandatorily referred from the detailed E-Auction Process Document, prior to submission of EMD and participation in the process. The Liquidator can be contacted at **liq.gooddayventures@gmail.com**

**Date: 26.09.2023**
**Place: Navi Mumbai**

**CA Prashant Jain**
**Liquidator – Goodday Ventures India Private Limited**
**IBBI Reg. No: IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131**
**Email ID: ipprashantjain@gmail.com; liq.gooddayventures@gmail.com**
**Correspondence Address: SSARVI Resolution Services LLP, B-610, BSEL Tech Park, Sec. 30 A, Vashi, Navi Mumbai- 400 705**
**Contact No: +91 9082607703 (Call on WhatsApp)**

# कोळसा टंचाईमुळे वीजनिर्मितीत बाधा?

## महानिर्मितीकडे दोन ते आठ दिवसांचाच कोळसा साठा

**महेश बोकडे, लोकसत्ता**

**नागपूर :** राज्यात पावसाळ्यात विजेची मागणी वाढली आहे. महानिर्मितीच्या वीजनिर्मिती प्रकल्पात कोळशाचा वापर वाढल्याने साठा केवळ दोन ते आठ दिवसांचा राहिला आहे. खासगी कोल वॉशरिजमध्ये मात्र महानिर्मितीचा लक्षावधी टन कोळसा पडून आहे. त्यामुळे कोळसा टंचाईच्या नावावर वीजनिर्मिती विस्कळीत झाल्यास जबाबदार कोण? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

राज्यात भर पावसात विजेची मागणी २६ हजार मेगावॉटपर्यंत वाढली होती. त्यापैकी २३ हजार मेगावॉटच्या जवळपासची मागणी महावितरणची होती. आताही राज्यात विजेची मागणी २३ हजार मेगावॉटच्या जवळपास आहे. ही मागणी जास्तच असून त्यापैकी १९ ते २० हजार मेगावॉटच्या जवळपासची मागणी महावितरणची आहे. राज्यात विजेची मागणी वाढल्याने वीजनिर्मिती वाढवावी लागल्याने कोळशाचा वापरही अपेक्षेहून जास्त वाढला आहे. त्यामुळे महानिर्मितीच्या केंद्रामधील कोळशाचा साठाही झपाट्याने कमी झाला आहे. केंद्रीय वीज प्राधिकरणाच्या नियमानुसार प्रत्येक केंद्रात किमान १५ दिवसांचा साठा असणे अपेक्षित आहे. परंतु हा साठा खूप कमी आहे. एकीकडे वीजनिर्मिती केंद्र कोळशासाठी अडचणीत असताना दुसरीकडे महानिर्मितीच्या मालकीचा १३ लाख टनांवर कोळसा खासगी वॉशरिजकडे पडून असल्याची तक्रार आहे. परंतु महानिर्मितीकडून मात्र हा साठा कमी असल्याचा दावा केला आहे.

### महानिर्मिती प्रकल्पातील कोळशाची स्थिती

| प्रकल्प | कोळसा साठा | प्रकल्प | कोळसा साठा |
|---|---|---|---|
| कोराडी | ८.५ दिवस | परळी | ३.५ दिवस |
| नाशिक | ४.५ दिवस | चंद्रपूर | ३ दिवस |
| भुसावळ | ३.५ दिवस | खापरखेडा | २ दिवस |



“कोल वॉशरिजकडे साडेतेरा लाख टन कोळसा शिल्लक नसून कमी आहे. शिल्लक कोळसा तातडीने वीजनिर्मिती प्रकल्पात पुरवठ्याच्या सूचना वॉशरिजला केल्या आहेत. यंदा विजेची मागणी वाढल्याने जास्त कोळसा लागला. ऑक्टोबर महिन्यात उष्णता वाढण्याचा अंदाज असल्याने आणखी कोळसा मागवला आहे.

**- राजेश पाटील,** कार्यकारी संचालक (कोळसा), महानिर्मिती, मुंबई.

# निवडणूक आयोगाचा निर्णय मान्य

### अजित पवार यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** आमदारांच्या अपात्रतेबाबतच्या बातम्या चौदा महिन्यांपासून सुरू आहेत. प्रत्येक यंत्रणा त्या त्या पद्धतीने काम करते. जोपर्यंत कुठला निकाल लागत नाही, तोपर्यंत मुख्यमंत्री पदाचा विचार करता येणार नाही. आमच्या गटाची कागदपत्रे निवडणूक आयोगाकडे पाठविली आहेत. आयोग घेईल तो निर्णय मान्य असेल, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. जोपर्यंत निकाल येत नाही तोपर्यंत जर तर या प्रकाराला काही अर्थ नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अजित पवार यांनी सोमवारी पुण्यातील काही गणेश मंडळांना भेट दिली. त्यानंतर पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या मुंबई दौऱ्याच्यावेळी बारामती येथे होतो. तशी माहिती अमित शहा यांच्या कार्यालयाला दिली होती, असे सांगत त्यांच्या अनुपस्थितीचे पुन्हा स्पष्टीकरण त्यांनी दिले.

निवडणूक आयोगाकडे शिवसेनेचे दोन्ही गट बाजू मांडतील. त्यानंतर अंतिम निर्णय होईल. राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही आयोगाला कागदपत्रे देण्यात आली आहेत. आयोगाचा निर्णय होईल तो मान्य असेल. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होऊन १४ महिने झाले आहेत. ज्या बातम्या येत आहेत. त्यामध्ये काही तथ्य नाही, असे पवार यांनी सांगितले.

राज्यातील सत्तासंघर्षानंतर येत्या मार्च, एप्रिल महिन्यात लोकसभा निवडणूक होणार आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातून अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ निवडणूक लढविणार असल्याची चर्चा आहे. यासंदर्भात बोलताना पवार म्हणाले की, लोकसभेचा विचार केला नाही. एवढ्या लवकर त्याबाबत चर्चा करणे फायदेशीर नाही. भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी अजित पवार यांच्याबाबत काही दिवसांपूर्वी वादग्रस्त विधान केले होते. त्यासंदर्भात विनाशकाले विपरीत बुद्धी, वाचाळवीर अशा शब्दांत पवार यांनी प्रतिक्रिया दिली. मलाही बोलता येते. मात्र, मी अशा लोकांकडे लक्ष देत नाही.

## मतदार नोंदणीसाठी आधार बंधनकारक नाही

**नवी दिल्ली :** मतदार ओळखपत्रासाठी आधार क्रमांक देणे हे ऐच्छिक असल्याचे लक्षात घेता नवी मतदार नोंदणी आणि मतदार यादीतील बदलांसाठीच्या अर्जांच्या नमुन्यात स्पष्टीकरणात्मक बदल केले जातील, अशी माहिती निवडणूक आयोगातर्फे गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात देण्यात आली.

मतदार नोंदणी (सुधारणा) नियम, २०२२ च्या नियम २६ ब मध्ये स्पष्टता येण्यासाठी बदल करावेत, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. आयोगाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने याचिका निकाली काढली.

# पुणे भाजपवर घराणेशाहीचा पगडा, जुनेजाणते घरी

**सुजित तांबडे, लोकसत्ता**

**पुणे :** घराणेशाहीला थारा नसल्याची वल्गना करणाऱ्या भाजपला पुण्यात मात्र घराणेशाहीची लागण लागल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपने पुणे शहराची कार्यकारिणी जाहीर केली असून, त्यामध्ये घराणेशाहीचा पगडा असल्याचे दिसून आले आहे. दिवंगत खासदार गिरीश बापट यांची स्नुषा स्वरदा आणि पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ यांचे पुत्र करण यांना स्थान देण्याबरोबरच नव्या चेहऱ्यांऐवजी मागील महापालिका निवडणुकांमध्ये भाजपमध्ये आलेल्यांना संधी मिळाल्याने मूळचे भाजपचे एकनिष्ठ विरुद्ध अन्य पक्षांतून आलेले भाजपनिवासी यांच्यात सुप्त संघर्ष सुरू झाला आहे.

पुणे महापालिकेचे माजी सभागृह नेते धीरज घाटे यांची शहराध्यक्षपदावर वर्णी लागल्यावर त्यांनी नवीन कार्यकारिणी जाहीर केली आहे. आगामी पुणे महापालिकेच्या निवडणुका विचारात घेता या कार्यकारिणीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

या कार्यकारिणीवर पालकमंत्री चंद्रकांत पाटील समर्थकांचे प्राबल्य आहे. मात्र, कार्यकारिणी तयार करताना भाजपच्या एकनिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना संधी देण्याऐवजी गेल्या महापालिका निवडणुकीत अन्य पक्षांतून भाजपमध्ये आलेल्यांना संधी देण्यात आल्याने मूळनिवासी भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

उपाध्यक्षपद दिलेले हरिदास चरवड हे मूळचे काँग्रेसचे आहेत. मागील निवडणुकीत ते भाजपच्या तिकिटावर नगरसेवक झाले. माजी नगरसेवक शाम देशपांडे हे शिवसेनेमध्ये होते. त्यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्यांची या पदावर वर्णी लागली आहे. रुपाली धावडे यांचे पती दिनेश धावडे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक आहेत. चिटणीसपदी नेमणूक झालेले किरण बारटक्के हे काँग्रेसचे माजी नगरसेवक आहेत. उमेश गायकवाड, अनिल टिंगरे आणि आनंद रिठे हे मूळचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक आहेत. गेल्या निवडणुकीत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. भाजपबाहेरून आलेल्यांना प्रमुख पदे मिळाल्याने निष्ठावंतांमध्ये धुसफुस सुरू झाली आहे.

पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ यांचा पुत्र करण मिसाळ यांना युवा मोर्चाचे अध्यक्षपद देण्यात आले आहे. उपाध्यक्षपदी दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या स्नुषा स्वरदा बापट यांना संधी देण्यात आली आहे. सरचिटणीस आणि भाजप महिला आघाडी शहर प्रमुखपदी नेमणूक केलेल्या वर्षा तापकीर या भाजपचे खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांच्या कुटुंबातील आहेत.


महावितरण

## ई-निविदा

म. रा. वि. वि. कं . मर्या., गडहिंग्लज विभागीय कार्यालय अंतर्गत चार उपविभागातील लघु दाब वाहिनी (LT), उच्च दाब वाहिनी (HT) व वितरण रोहित्र केंद्र (DTC) यामधील देखभाल दुरुस्ती (**Preventive Maintenance**) कामासाठी रु १० लक्ष प्रत्येकी याप्रमाणे ई .निविदा क्रं .टी. १२ ते टी.१७/२०२३.२४ महावितरणच्या **https://etender-mahadiscom-in/eatApp/** संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आली आहे. सदर निविदा विक्रीसाठी २६.०९.२०२३ पासून ०२.१०.२०२३ पर्यंत उपलब्ध राहील. कार्यालयीन संपर्क क्रं .७८७५९२९०३३

पी . आर .ओ . - ११९/२३-२४

कार्यकारी अभियंता
गडहिंग्लज



## टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.

नोंद. कार्यालय : 11 वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400013. **CIN No. U67190MH2008PLC187552**
संपर्क क्रमांक (022) 61827414, (022) 61827375

### ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

**(सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेन्ट रुल्स, 2002 च्या नियम 8(1) नुसार)**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद कर्जदारांना एक मागणी सूचना निर्गमित केली ज्यात त्यांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सूचनेत नमूद रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.
कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी नियम 8 सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. याद्वारे कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सावधगिरीची सूचना देण्यात येते की सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या खाली उल्लेख केलेल्या रकमेसाठी सोबत त्यावरील व्याज आणि दंडासह व्याज, शुल्क, खर्च इ. एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.
अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येते.

| कर्ज खाते क्र. | बाध्यताधारी / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधी यांचे नाव | मागणी सूचनेची दिनांक आणि रक्कम | ताबा तारीख |
|---|---|---|---|
| TCHHF0279000100006170 | श्री. राजेंद्र तुपे आणि सौ. मनिषा राजेंद्र तुपे | दि. 16-06-2023 रोजी नुसार रक्कम रु. 1692329/- (रुपये सोळा लाख ब्याण्णव हजार तीनशे एकोणतीस फक्त) आणि 16-06-2023 | 21.09.2023 |

**सुरक्षित मालमत्ता / अचल मालमत्तेचे वर्णन :- अनुसूची - अ**
मालमत्ता क्र. 1 - फ्लॅट क्र. 103, मोजमाप 580 चौ. फू., "विराज प्राईड" बिल्डिंग मधील विंग 'ए' मध्ये, जमीन संबंधित गट क्र. 58 वर बांधकाम, गाव मौजे उरुळी कांचन, तालुका हवेली, जि. पुणे येथे स्थित.
मालमत्ता क्र. 2 - फ्लॅट क्र. 104, मोजमाप 626 चौ. फू., "विराज प्राईड" बिल्डिंग मधील विंग 'ए' मध्ये, जमीन संबंधित गट क्र. 58 वर बांधकाम, गाव मौजे उरुळी कांचन, तालुका हवेली, जि. पुणे येथे स्थित.

दिनांक : 26.09.2023
स्थान : पुणे

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करिता



## गुडडे व्हेंचर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - अवसायनात

**LLPIN : U29190MH1992PTC065241**
नोंद. कार्यालय : 133, क्लोव्हर सेंटर, कॅम्प, 7, मोलेदिना रोड, एनए, पुणे, महा - 411001

### ई-लिलाव सूचना

आयबीबीआय (अवसायन प्रक्रिया) रेग्युलेशन्स, 2016 सह वाचण्यात येणाऱ्या नादारी व दिवाळखोरी संहिता, 2016 अंतर्गत अवसायकांद्वारे स्वतंत्र तत्त्वावर कॉर्पोरेट कर्जदाराच्या मत्तेची विक्री
**ई-लिलाव दिनांक आणि वेळ : 30 ऑक्टोबर 2023 रोजी सका. 11.00 ते दु. 02.00 वाजेपर्यंत**
**(10 मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारासह)**

माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्या सी.पी. (आयबी)-3060, 2019 मधील आय.ए. 2883, 2021 मधील दि. 03 मार्च,2023 रोजीच्या आदेशान्वये नियुक्त करण्यात आलेल्या अवसायकांद्वारे स्वतंत्र तत्त्वावर कॉर्पोरेट कर्जदाराच्या मत्तेची विक्री. सदर विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे **https://eauctions.co.in (लिंकस्टार इन्फोसिस प्रायव्हेट लिमिटेड)** या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून घेण्यात येईल.

| मत्तांचे वर्णन | ब्लॉक | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम | वृद्धी मूल्य |
|---|---|---|---|---|
| निवासी घर क्र. बी-2 व सी-3, मॉन कासल, सर्वे क्र. 68/1,68/2, 68/3/1, 68/3 /2ए, 68/4,68/5,68/6,उटोपियाको-ऑप. हा.सो., वानवडी, तालुका हवेली, पुणे,एकूण क्षेत्रफळ सुमारे 4150 चौ.फू. ('रो हाऊस मालमत्ता) | I | रु. 5,29,12,500.00 | रु. 52,00,000.00 | रु. 2,00,000.00 |

| | |
|---|---|
| अर्हता दस्तावेज सादर करण्याचा शेवटचा दिनांक | **13 ऑक्टोबर, 2023 रोजी सायं. 5 वाजेपर्यंत, तपशीलवार ई-लिलाव प्रक्रिया दस्तावेजामध्ये नमूद केलेल्या पद्धतीने** |
| अर्हताप्राप्त बोलीदार घोषित करणे | **16 ऑक्टोबर, 2023 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत** |
| कॉर्पोरेट कर्जदाराच्या मालमत्तेच्या पाहणीचा दिनांक | **17 ऑक्टोबर, 2023 ते 25 ऑक्टोबर, 2023 पर्यंत** |
| बयाणा रक्कम सादर करण्याचा शेवटचा दिनांक | **28 ऑक्टोबर, 2023** |
| अर्हताधारक बोलीदारांसाठी ई-लिलावाचा दिनांक व वेळ | **30 ऑक्टोबर, 2023 रोजी स. 11.00 ते दु. 02.00 वाजेपर्यंत** |

**विक्रीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत : 1.** ही विक्री कुठल्याही वॉरन्टी व नुकसानभरपाईविना असल्याने सदर ई-लिलाव मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार लिंकस्टार इन्फोसिस प्रायव्हेट लिमिटेड यांचेद्वारे ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'', ''तेथे जे काही आहे'' (असल्यास, फर्निशिंग, फिक्सचर्स आणि उपकरणे वगळता) आणि ''उपाय नाही'' तत्त्वावर राबविण्यात येईल. ई-लिलाव एजन्सी (लिंकस्टार) च्या वतीने संपर्क व्यक्तीः श्री दीक्षित प्रजापती ईमेल **id-admin@eauctions.co.in** मोबाईल क्र.: +91 9870099713. **2.** दस्तावेज 13 ऑक्टोबर, 2023 पर्यंत तपशीलवार लिलाव दस्तावेजामध्ये विहित करण्यात आलेल्या नमुन्यात अवसायकांकडे ईमेलद्वारे आणि छापील प्रतीच्या स्वरुपात सादर करण्यात यावेत. संपूर्ण ई-लिलाव प्रक्रियेच्या अटी व शर्तीच्या तपशिलासह बोली प्रपत्र **https://eauctions.co.in** या वेबसाईटवरुन डाऊनलोड करता येईल. **3.** येथे ये स्पष्ट करण्यात येते की हे संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करणारे आमंत्रण असून ते अवसायक किंवा कंपनीवर विक्री करण्याचे कोणतेही बंधन निर्माण करत नाही. कुठलेही कारण न देता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय सदर प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा तीमध्ये बदल करण्याचा आणि/किंवा एखाद्या इच्छुक पक्षास / संभाव्य गुंतवणूकदारास / बोलीदारास अपात्र ठरविण्याचा आणि/ किंवा त्यांची बोली स्वीकारण्याचा अधिकार अवसायक राखून ठेवतात. **4.** बयाणा रक्कम सादर करण्याअगोदर आणि प्रक्रियेत सहभागी होण्याअगोदर तपशीलवार ई-लिलाव प्रक्रिया दस्तावेजामधील सर्व अटी व शर्ती वाचणे अनिवार्य आहे. अवसायकांशी **liq.gooddayventures@gmail.com** येथे संपर्क साधता येईल.

**सीए प्रशांत जैन**
**अवसायक - गुडडे व्हेंचर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**
**आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131**
**पत्रव्यवहाराचा पत्ताः एसएसएआरव्ही रेझोल्युशन सर्व्हिसेस एलएलपी, बी-610, बीएसईएल टेक पार्क, सेक्टर 30 ए, वाशी, नवी मुंबई - 400 705**
**संपर्क क्र.: +91 9082607703 (व्हॉट्सअॅप वर कॉल करावा)**

दिनांक : 26.09.2023
स्थान : नवी मुंबई



ADVERTORIAL



Balan
INDRANI BALAN FOUNDATION, PUNE प्रस्तुत

लोकसत्ता
## लोककल्याण



**भव्यदिव्य देखावे,** रोषणाईवरचा खर्च टाळून शहरातील अनेक मंडळे समाजोपयोगी उपक्रम राबवितात. येरवडा भागातील कष्टकऱ्यांच्या वसाहतीत समाजोपयोगी उपक्रम राबविणारे नवज्योत मित्र मंडळाने दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. कातकरी बांधवांसोबत दिवाळी, गणरायाला पुस्तकांचा नैवेद्य, शाळकरी मुलांची विनामूल्य सायकल दुरुस्ती असे अनेक उपक्रम राबविणाऱ्या नवज्योत मित्र मंडळाने सामाजिक कार्याचे व्रत अंगीकारले आहे.

शहरातील मध्य भागात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. वर्षभर विविध उपक्रम मंडळांकडून राबविण्यात येतात. त्या तुलनेत उपनगरातील मंडळे उत्सव साजरा करण्यापुरतीच मर्यादित असतात. उपनगरातील अनेक मंडळांकडून सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतात.

येरवडा भागातील नवी खडकी परिसरात असलेले नवज्योत मित्र मंडळाने विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. येरवडा भागातील आगळे वेगळे उपक्रम राबविण्यात मंडळ अग्रेसर असल्याचे नवज्योत मित्र मंडळाचे अध्यक्ष अमित जाधव यांनी सांगितले.

विविध उपक्रम राबविण्यासाठी मंडळाचे पदाधिकारी विकास धोत्रे, अक्षय रजपूत, शुभम पोळ, राहुल रजपूत यांच्यासह कार्यकर्त्यांचे महत्त्वाचे योगदान असते. उपनगरातील मंडळे पौराणिक, सामाजिक आशय असणारे देखावे सादर करतात. आमच्या मंडळाने येरवडा भागात विज्ञानावर आधारित देखावे साकारण्याची परंपरा जोपासली आहे. मंडळाने गेल्या वर्षी भारतीय अवकाश संशोधन संस्थेची (इस्रो) माहिती देणारा देखावा सादर केला होता. या देखाव्यातील यान आकर्षण ठरले होते. मंडळाचे कार्यकर्ते परिश्रम घेऊन देखावे साकारतात. तांत्रिक बाबी कार्यकर्ते सांभाळतात. देखावे साकारण्यासाठी बाहेरील कलाकारांची मदत घेतली जात नाही. यंदा मंडळाने छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमार ते भारतीय नौदल याविषयी माहिती देणारा देखावा साकारला आहे. आयएनएस विक्रांत युद्धनौका देखाव्यात मांडण्यात आली आहे. छोटेखानी युद्धनौका मंडळाच्या कार्यकर्त्यांनी तयार केली असल्याचे त्यांनी सांगितले.

# समाजोपयोगी उपक्रम राबविणारे ‘नवज्योत मित्र मंडळ’







करोना संसर्गात निर्बंध असल्याने मंडळाने ऑनलाइन गणेशोत्सव साजरा केला होता. ऑनलाइन गणेशोत्सवात डॉ. श्रीपाल सबनीस, मोहन शेटे, पराग ठाकूर, अनिकेत जाधव आदींची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. मंडळाकडून दरवर्षी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. भीमाशंकर परिसरातील पोखरी गावातील मुलांचे पालकत्व मंडळाने स्वीकारले आहे. त्यांचा शैक्षणिक खर्च मंडळाकडून करण्यात येतो, तसेच त्यांना शालोपयोगी साहित्य देण्यात येते. पुणे जिल्ह्यातील दुर्गम भागातील कातकरी वस्तीत दरवर्षी दिवाळी साजरी करण्यात येते. कातकरी वस्तीत फराळ, आकाशकंदील, गृहोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आगळ्या पद्धतीने साजरी करण्यात येते. डॉ. आंबेडकर जयंतीच्या दिवशी पुस्तकांचे वाटप करण्यात येते, असे जाधव यांनी नमूद केले.

मंडळाकडून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. मंडळाने यंदा शाडू मातीपासून मूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण शाळकरी मुलांना दिले. मंडळाने यंदा विसर्जनासाठी शाडू मातीची छोटी मूर्ती तयार केली आहे. शाळकरी मुलांना पालक सायकल घेऊन देतात. सायकलमध्ये बिघाड झाल्यानंतर दुरुस्ती केली जात नाही. सायकली तशाच पडून राहतात. मंडळाने स्वातंत्र्यदिनी शाळकरी मुलांसाठी सायकल दुरुस्ती शिबिराचे आयोजन केले होते. मंडळ पुढील सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करणार आहे. समाजातील वंचित, दुर्बल घटक, विद्यार्थ्यांसाठी यापुढील काळात सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत, असे जाधव यांनी सांगितले.

सर्व भक्तांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !



Balan Group
INDRANI BALAN FOUNDATION, PUNE